जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/०८/२०२३
## दि.१२/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३८४/२०२३,भादविक ३८०,४५७,३७९,५११ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २४ वर्षे,रा.न-हे,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०८/२०२३ रोजीचे रात्रौ ०२/०० ते ०२/३० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.२०६,मल्हार प्राईड,श्री कंट्रोल चौक,न-हे,पुणे व बिल्डींगचे डी-विंग पार्कीग मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य लोखंडी सेफ्टी दरवाजाचे लॉक तोडुन व लाकडी दरवाजाचे कडी-कोयंडा कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व टाटा कंपनीची टिआगो गाडी क्र.एमएच/४८/एडब्ल्यु/८३८५ ही ३,००,०००/- रु किंमतीची असा एकुण ५,९६,३००/- किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. तसेच फिर्यादी यांचे शेजारी असलेला फ्लॅटनं.२०५ हिचेदेखील कडी-कोयंडा व कुलुप तोडुन चोरीचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, प्रविण जाधव ८७८८८३१६३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे १९४/२०२३,भादविक १४३,४२७,३२३,५०४,५०६,३८० |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ५१ वर्ष,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व इतर अनोळखी ७ ते ८ महीला व पुरूष (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०७/२०२३ रोजी सकाळी १०/४५ वा. व दि.२०/७/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा.चे दरम्यान क्लोअर सेंन्टर कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी क्लोअर सेंन्टर कॅम्प,पुणे येथे येथे नमुद इसम यांचे मालकीचे दुकान भाडेतत्वावर घेतले आहे. सदरचे दुकान मालक व फिर्यादी यांचेमध्ये कोर्ट प्रकरण चालु असताना,सदर दुकानाचे मालक व त्यांचा मुलगा व इतर अनोळखी महीला व पुरूष यांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी यांचे दुकानात बेकायदेशीरपणे घुसुन,फिर्यादी यांचे दुकानातील काऊंटरची तोडफोड करून,त्यामधील १७,०००/- रूपये रोख रक्कम चोरी करुन फिर्यादी व त्यांचे दुकानातील कामगारांना शिवीगाळ व मारहाण करून,फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अक्षय गायकवाड ९५८८६१६१५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३७९/२०२३,भादविक ३५३,३५२,५०६,३४ |
| **फिर्यादी** | अजय शेळके, पोलीस अंमलदार, चंदननगर पो स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | दोन इसम व इतर दोन महीला (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०८/२०२३ रोजी २३/५० वा.चे दरम्यान दत्त हॉटेल यशवंतनगर,खराडी,पुणे व दि. १२/०८/२०२३ रोजी रात्रौ ००/०५ वा.शिवराणा चौकी येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पोलीस अंमलदार विजय गायकवाड यांचेसह शिवराणा मार्शल म्हणुन रात्रपाळी कर्तव्यावर हजर असताना,फिर्यादी यांना नियंत्रण कक्षावरुन कॉल आल्याने,सदर कॉलची पुर्तता करणेकामी सदर ठिकाणी जावुन,यातील नमुद दोन इसम व इतर दोन महीला यांना भांडणाबाबत समजावुन सांगत असताना,त्यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे बरोबर हुज्जत घालुन,त्यांचे अंगावर धावुन आले. फिर्यादी यांनी चौकशीसाठी त्यांना शिवराणा चौकी येथे आणले असता,त्यांनी फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण करुन सदरचे सरकारी काम करण्यापासुन त्यांना परावृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, भगवान कांबळे ८२०८३८३४६३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २८६/२०२३,भादविक ३३६,३२३,५०४,४२७,३४,क्रिमिनल लॉ अमेन्टमेन्ट क.०७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४५ वर्षे,रा.औंध रोड,खडकी,पुणे |
| **आरोपीत** | १.अरमान अमिर शेख,वय १९ वर्ष,रा.१५,चिखलवाडी,खडकी,पुणे २.जोईद जावेद शेख,वय १९ वर्ष,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०८/२०२३ रोजी रात्री ११/०२ वा.अमर हाईट बिल्डींग समोर,औंध रोड,खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांची फोर्स कंपनीचा टेम्पो ट्रॅव्हलर नमुद ठिकाणी पार्क करुन ठेवला असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,सदर टेम्पो ट्रॅव्हलरचे पुढील काचेवर दगड मारुन,गाडीची काच फोडून,६,५००/- रुपये किमतीचे नुकसान केले. तसेच सदर रोडवरुन येणा-या-जाणा-या नागरीकांना शिविगाळ व आरडा-ओरडा करुन,त्यांचे अंगावर दगड फेकुन मारुन,दहशत निर्माण करून,नागरीकांचे जीवीतास धोका निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मालोजी कांबळे ९५५२५६१८३५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**